# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/01/2024 (बुधवार) सकाळ

---

## ऑनलाईन फसवणुकीची रक्कम तक्रारदारास परत करण्यास सायबर पोलीस स्टेशनला मिळाले यश

पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. बोरी अंतर्गत तक्रारदार नामे राधेमोहन सिंग रा. एम.आय.डी.सी. बोरी यांना टेलीग्रामवर पार्टटाईम जॉबची जाहीरात दिसल्याने तक्रारदारने सदर लिंकवर संपर्क केला असता यातील आरोपीने स्काय स्कॅनर नावाचे प्लॅटफार्मवर जोडुन तक्रारदारला टास्क दिले. सदर टास्क पुर्ण झाल्यावर त्या बदल्यात तुम्हाला पैसे देण्यात येतील असे सांगुन तक्रारदारला काही रक्कम गुंतवणुक करण्यास सांगीतले तक्रारदारने त्यावर विश्वास ठेवुन रक्कम गुंतवत गेला. असे करत १,२०,०००/— रूपयाची गुंतवणुक केल्यावर तक्रारदारचे लक्षात आले की, आपल्या सोबत फसवणुक होत आहे. या नंतर तक्रारदाराने NCCRP Portal वर ऑनलाईन तक्रार केली.

सदर तक्रार सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण येथे प्राप्त होताच तपासाचे सुत्र हालवुन सदर तक्रारदारचे पैसे कोणकोणत्या खात्यावर ट्रान्सपर झाले याची माहिती तात्काळ घेण्यात आली. व सायबर फ्रॉड मधील आरोपी पैसे लवकर विड्रॉल करतात याची माहिती असल्यामुळे ज्या खात्यावर पैसे ट्रान्सपर झाले आहे ते सर्व अकांउट डेबिट फ्रिज केले. त्यामुळे तक्रारदारचे पैसे आरोपीच्या खात्यामध्ये होल्ड झाले. त्यांनतर तक्रारदारला बोलवुन कोर्टा मध्ये सदर रक्कम परत घेण्याबाबत योग्य मार्गदर्शन करून मा. कोर्ट नागपूर येथे पैसे परत घेणे करीता सुपूर्दनामा दाखल केला. मा. कोर्टाने कार्यवाही पूर्ण करून आज दिनांक ०३/०१/२०२४ रोजी तक्रारदारचे फसवणुक झालेली रक्कम परत करण्याचे आदेश पारित केले. यांमुळे तक्रारदारने सायबर पोलीस स्टेशन व मा. न्यायालयाचे आभार मानले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेन्द्र निकम, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, महिला पोलीस हवालदार स्नेहलता ढवळे, वर्षा खंडाईत, पोलीस नायक सतीष राठोड, संगीता गावंडे, ममता सरोदे, पोलीस अंमलदार मृणाल राऊत, मनीष नेवारे यांनी पार पाडली.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. वेलतूर :—** पो.स्टे. वेलतूर हद्यीत दिनांक ०२/०१/२०२४ रोजी फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १४ वर्ष १७ दिवस हि दिनांक २७/१२/२०२३ रोजी दुपारी १४/०० वा. सुमारास फिर्यादी हि शेतात कामाला गेली तेव्हा फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हि घरी हजर होती. फिर्यादी हि शेतातुन १७/०० वा. सुमारास घरी परत आली तेव्हा फिर्यादीची मुलगी घरी दिसुन न आल्याने फिर्यादी व नातेवाईक यांनी आज पावेतो मुलीचा शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला कोणीतरी अज्ञात आरोपी याने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक जोशी यांनी भेट दिली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक जोशी मो. क्र. ७८७५९६६६७६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**